अर्थसंकल्पीय अनुदान सन २०१५-२०१६
मागणी क्र. एल-३ २५१५इतर ग्राम विकास कार्यक्रम १०१ पंचायती राज (०१) (०२) मागास व आदिवासी क्षेत्रातील ग्राम पंचायतीना वित्तीय सहाय्य (२५१५००४४) -३१ सहाय्यक अनुदाने

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अर्थसं-२०१५/प्र.क्र.१९ /वित्त-२

बांधकाम भवन इमारत- २५, मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
तारीख: १९ जानेवारी, २०१६

वाचा -

1) **शासन निर्णय क्रमांकः** ग्राम विकास विभाग क्र.व्हीपीजी:-१०८९/प्र.क्र.३०१९/२२/ दि.२३/८/१९८९

शासन निर्णय-

मागास व आदिवासी क्षेत्रातील ग्राम पंचायतींना वित्तीय सहाय्य अदा करण्यासाठी सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षासाठी रु.२१,००,००० (अक्षरी रुपये एकविस लक्ष फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यांत आली आहे. यापैकी ७० % च्या मर्यादेत रु. १४,७०,०००/- इतके अनुदान वितरीत केले आहे.

१. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि.१२ जानेवारी, २०१६ मधील तरतूदीनुसार अर्थसंकल्पीय तरतुदीच्या ८५ % च्या मर्यादेत वितरणास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने अर्थसंकल्पीय तरतूदीपैकी १५ % च्या मर्यादेत **रु. ३,१५,०००/-(अक्षरी रुपये तीन लक्ष पंधरा हजार फक्त)** इतके अनुदान सोबतच्या विवरणपत्रात नमुद केल्यानुसार विभागीय आयुक्ताकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

२. विभागीय आयुक्तांनी या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेल्या अनुदानाची रक्कम जिल्हाधिकारी यांच्याकडे वितरीत करावी आणि वितरण आदेशाच्या प्रती शासनाकडे पाठवाव्यात. मंजूर अनुदानापेक्षा जादा खर्च होणार नाही व सदर अनुदानावरील कारणाकरीताच खर्च होईल याबाबत दक्षता घ्यावी.

३. खर्चाचा मेळ घालण्यासाठी जिल्हाधिका-यांनी खर्चाची विवरणपत्रे विभागीय आयुक्तांना पाठवावीत. विभागीय आयुक्तांनी त्या खर्चाचे महालेखापाल महाराष्ट्र १ व २ मुंबई / नागपूर या कार्यालयाशी ताळमेळाचे काम करावे व त्याबाबतचा अहवाल शासनाकडे पाठवावा.

४. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. एल -३,लेखाशिर्ष " २५१५" इतर ग्रामविकास कार्यक्रम, १०१ पंचायती राज (०१)(०२)मागास व आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतींना वित्तीय सहाय्य (२५१५००४४) (योजनेतर)३१ सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली टाकण्यात यावा व तो उपरोक्त लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात मंजूर केलेल्या अर्थसंकल्पिय तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. हे अनुदान शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्देशित केलेल्या विहित अटी व शर्तीच्या अधीन राहील.

६. हा निधी ज्या प्रयोजनांसाठी देण्यात येतो त्या प्रयोजनासाठीच खर्च करण्यात यावा यांची दक्षता घेण्यात यावी. सदर निधी तात्काळ खर्च करावा निधी खर्च न झाल्यास संबंधितांना जबाबदार धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

७. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प-३ दि.१२/०१/२०१६ मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११९१६४४३१२९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.19 17:00:53 +05'30'

(पां.रा. खोटरे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखापरिक्षा) (५ जादा प्रतीसह)
२) महालेखापाल, महाराष्ट्र -१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता) (५जादा प्रतीसह)
३) महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर (लेखा परिक्षा) (५ जादा प्रतीसह)
४) महालेखापाल, महाराष्ट्र -२, नागपूर (लेखा व अनुज्ञेयता)(५ जादा प्रतीसह)
५) विभागीय आयुक्त (सर्व)
६) जिल्हाधिकारी (सर्व)
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
८) उप मुख्य लेखापरिक्षक,स्थानिक निधी लेखा,कोकण (नवीमुंबई वाशी /पुणे/ नाशिक/

अमरावती/ औरंगाबाद/ नागपूर)

९) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई

१०) निवासी लेखा अधिकारी,लेखा व अधिदान कार्यालय मुंबई

११) आयुक्त आदिवासी विकास विभाग,नाशिक (योजना आणि नियंत्रक)

१२) अतिरिक्त आदिवासी विकास विभाग,नागपुर

१३) अतिरिक्त आदिवासी विकास विभाग,नाशिक

विवरणपत्र

मागणी क्र. एल-३, लेखाशिर्ष:- २५१५ इतर ग्राम विकास कार्यक्रम- १०१ पंचायती राज (०१)(०२) मागास व आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतीना वित्तीय सहाय्य (२५१५००४४)-३१ सहायक अनुदाने या खाली सन २०१५-२०१६ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर करावयाचा हप्ता.
(शासन निर्णय क्रमांक अर्थसं -२०१५/प्र.क्र.१९ /वित्त-२, दि.१९ जानेवारी, २०१६ चे सहपत्र)

(रक्कमा / रुपयांत)

अ. क्र.	विभागीय आयुक्तांचे नांव	सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर अंदाजपत्रकीय तरतूद.	दिनांक १५/०६/२०१५ च्या शासन निर्णयान्वये वितरीत तरतूद	या शासन निर्णयाअन्वये मंजूर केलेले अनुदान	अक्षरी	या शासन निर्णयापर्यत मंजूर केलेले अनुदान
१	२	३	४	५	६	७
१	कोकण विभाग, कोकण.	३२७६३७	२२९३४६	४९१४५	रुपये एकोणपन्नास हजार एकशे पंचेचाळीस फक्त	२७८४९१
२	नाशिक विभाग, नाशिक.	६०५७६९	४२४०३८	९०८६५	रुपये नव्वद हजार आठशे पासष्ठ फक्त	५१४९०३
३	पुणे विभाग, पुणे.	४९३६४७	३४५५५३	७४०४६	रुपये चौ-याहत्तर हजार शेहचाळीस फक्त	४१९५९९
४	औरंगाबाद विभाग, औरंगाबाद.	२७९५९	१९५७१	४१९४	रुपये चार हजार एकशे चौ-याण्णव फक्त	२३७६५
५	अमरावती विभाग, अमरावती,	३८२४८९	२६७७४२	५७३७५	रुपये सतावन्न हजार तीनशे पंच्याहत्तर फक्त	३२५११७
६	नागपूर विभाग, नागपूर.	२६२५००	१८३७५०	३९३७५	रुपये एकोणचाळीस हजार तीनशे पंच्याहत्तर फक्त	२२३१२५
	एकूण	**२१०००००**	**१४७००००**	**३१५०००**	**रुपये तीन लक्ष पंधरा हजार फक्त**	**१७८५०००**

Pandurang Rawaji Khotare

Digitally signed by Pandurang Rawaji Khotare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Section Officer, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=241eb93ab449def8114b5fbff2ea51ab0f16e0092f0102aa9502d0457228dd65, cn=Pandurang Rawaji Khotare
Date: 2016.01.19 17:01:20 +05'30'

(पां.रा. खोटरे)
कक्ष अधिकारी,महाराष्ट्र शासन